‘टीसीएस’ला १२,३८० कोटींचा तिमाही नफा

७७ रुपयांचा घसघशीत लाभांश

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : टाटा समूहातील आघाडीची कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने (टीसीएस) डिसेंबरअखेर सरलेल्या तिसऱ्या तिमाहीतील आर्थिक कामगिरी गुरुवारी जाहीर केली. तिमाहीत कंपनीचा एकत्रित निव्वळ नफा ११.९५ टक्क्यांनी वधारून १२,३८० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. नफ्याची कामगिरी बाजार विश्लेषकांच्या अपेक्षेनुरूप नसली तरी, कंपनीने भागधारकांना प्रति समभाग ७७ रुपयांच्या लाभांशाचा नजराणा मात्र घोषित केला आहे.

- टीसीएसच्या संचालक मंडळाने भागधारकांना प्रति समभाग १० रुपये तिसरा अंतरिम लाभांश दिला आहे. तसेच मार्च २०२५ अखेर सरणाऱ्या आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ६६ रुपये प्रति समभाग विशेष लाभांश देण्याची घोषणा केली आहे.
- म्हणजेच एकूण ७७ रुपयांचा घसघशीत लाभांश भागधारकांना मिळणार आहे. या लाभांश प्राप्तीसाठी भागधारकांची पात्रता म्हणून १७ जानेवारी ही खातेनोंद अर्थात ‘रेकॉर्ड’ तारीख कंपनीने निश्चित केली आहे.
- येत्या ३ फेब्रुवारी रोजी भागधारकांना अंतरिम लाभांश आणि विशेष लाभांशाचे वाटप केले जाईल.

> तिसऱ्या तिमाहीत कंपनीने उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. कंपनीने अपस्किलिंग अर्थात कौशल्य वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यासाठी कृत्रिम प्रज्ञा (एआय) त्यातील नवीनीकरण आणि त्यासंबधित भागीदारीमध्ये गुंतवणूक वाढवत आहे.
>
> **– के. कृतिवासन**, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक, टीसीएस

गेल्या वर्षी याच डिसेंबर तिमाहीत कंपनीने ११,०५८ कोटी रुपयांचा नफा नोंदवला होता. तर याआधीच्या सप्टेंबर तिमाहीमध्ये कंपनीने ११,९०९ कोटी रुपये निव्वळ नफा मिळवला होता. टीसीएसचे एकूण उत्पन्न डिसेंबर तिमाहीत ६.१३ टक्क्यांनी वधारून ६५,२१६ रुपयांवर पोहोचले आहे. जे मागील वर्षीच्या याच तिमाहीत ६१,४४५ कोटी रुपये होते आणि सप्टेंबर तिमाहीत ते ६४,९८८ कोटी रुपयांपेक्षा अधिक राहिले होते. कंपनीकडे सरलेल्या तिमाहीअखेर १,०२० कोटी डॉलरचे कार्यादेश आहेत. जे गेल्या वर्षी या कालावधीत ८६० कोटी डॉलरवर मर्यादित होते. तर कंपनीच्या खर्चातदेखील ६.३३ टक्क्यांची वाढ झाली आहे. मागील वर्षीच्या याच तिमाहीमधील ४५,६५८ कोटी रुपयांवरून, खर्च सरलेल्या तिमाहीत ४८,५५० कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

गुरुवारच्या सत्रात टीसीएसचा समभाग १.६९ टक्क्यांच्या घसरणीसह ४,०३८.८५ रुपयांवर स्थिरावला. टाटा समूहातील या सर्वाधिक मौल्यवान कंपनीचे सध्याच्या बाजारभावानुसार, १४.६१ लाख कोटींचे बाजार भांडवल आहे.

अदानी विल्मरची प्रत्येकी २७५ रुपयांना समभाग विक्री

मुंबई : खाद्यतेलासह विविध ग्राहकोपयोगी उत्पादनांच्या क्षेत्रात वेगाने विकास पावत असलेली ‘अदानी विल्मर लिमिटेड’ आंशिक समभाग विक्रीच्या (ओएफएस) माध्यमातून २० टक्के हिस्सा विक्री करणार आहे. आंशिक समभाग विक्री १० जानेवारीपासून खुली होती असून गुंतवणूकदारांना १३ जानेवारीपर्यंत अर्ज करता येईल.

अदानी विल्मरच्या प्रवर्तक संस्थांपैकी एक असलेल्या अदानी कमोडिटीज ऑफर फॉर सेलद्वारे कंपनीतील २० टक्के हिस्सा विकणार आहे, ज्यासाठी २७५ रुपये प्रतिसमभाग किंमत निश्चित करण्यात आली आहे. मुंबई शेअर बाजारात गुरुवारच्या सत्रात अदानी विल्मरचा समभाग ३२४ रुपयांवर व्यवहार करत स्थिरावला. किरकोळ गुंतवणूकदारांना केवळ १३ जानेवारी रोजी बोली लावता येणार आहे.

‘इक्विटी फंडा’त ४१,१५६ कोटींचा ओघ

स्मॉल, मिडकॅप फंडातील गुंतवणुकीचे मोठे योगदान

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: सेन्सेक्स-निफ्टीतील मोठ्या घसरणीचा महिना राहिलेला डिसेंबरमध्ये, गुंतवणूकदारांनी समभागसंलग्न अर्थात इक्विटी म्युच्युअल फंडांमध्ये मोठी गुंतवणूक सुरूच ठेवली असून, परिणामी या महिन्यांत या ४१,१५६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा प्रवाह इक्विटी फंडांनी अनुभवला, असे गुरुवारी जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीने स्पष्ट केले. भांडवली बाजाराचा कल प्रचंड नकारात्मक असूनही, इक्विटी फंडातील ओघ मासिक आधारावर १४ टक्क्यांनी वाढला आहे.

समभागसंलग्न अर्थात इक्विटी योजनांनी डिसेंबरमध्ये ४१,१५६ कोटी रुपयांचा नक्त प्रवाह पाहिला, जो नोव्हेंबरमध्ये आलेल्या ३५,९४३ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या तुलनेत १४.४ टक्क्यांनी वाढला आहे. याआधी ऑक्टोबर २०२४ मध्ये इक्विटी योजनांमध्ये ४१,८८७ कोटी रुपयांचा आजवरचा सर्वाधिक ओघ दिसून आला. उल्लेखनीय म्हणजे समभागसंलग्न फंडांमध्ये सकारात्मक प्रवाहाचा हा सलग ४६ वा महिना असून, गुंतवणूकदारांमध्ये म्युच्युअल फंडांच्या वाढत्या आकर्षणाला याने अधोरेखित केले आहे, असे ‘असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया (ॲम्फी)’ गुरुवारी मासिक आकडेवारी प्रसिद्ध करताना म्हटले आहे.



म्युच्युअल फंडांच्या स्मॉल आणि मिडकॅप योजनांकडे गुंतवणूकदारांचे लक्षणीय आकर्षण असून, सरलेल्या डिसेंबर महिन्यांत त्यातील गुंतवणुकीने विक्रमी उच्चांक गाठला, असे ‘ॲम्फी’ने म्हटले आहे. नोव्हेंबर २०२४ मधील गुंतवणुकीच्या तुलनेत सरलेल्या डिसेंबर महिन्यात मिडकॅप फंड योजनांमधील गुंतवणूक ४ टक्क्यांनी वधारून ५,०९३ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. मात्र त्या तुलनेत लार्जकॅप फंडामधील गुंतवणुकीमध्ये २१ टक्क्यांची घसरण झाली असून डिसेंबर महिन्यात त्यात २,०१० कोटींचा ओघ राहिला, जो आधीच्या महिन्यात २,५४७ कोटी होता. स्मॉलकॅप फंड योजनांमधील गुंतवणूक १३.५ टक्क्यांनी वधारून ४,६६७ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. नोव्हेंबर महिन्यात स्मॉलकॅप फंडांनी ४,१११ कोटी रुपयांची गुंतवणूक आकृष्ट केली होती.

‘सहकारातील त्रिस्तरीय पतरचनेची साखळी मजबूत करण्याची गरज’

मुंबई: ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी गावातील विकास सहकारी सोसायट्या सक्षम करणे गरजेचे आहे. यासाठी विकास सोसायटी ते जिल्हा बँक ही साखळी मजबूत करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले.

जिल्ह्यातील सहकाराचे सर्व आर्थिक व्यवहार सहकारी जिल्हा बँकेतूनच करावेत असे आवाहनही मोहोळ यांनी केले. राज्यातील शिखर बँक असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतर्फे आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी बँकेची सहकार गॅलरी, बँकेचे नवे बोधचिन्ह, नवा ध्वज आणि बँकेच्या सहकार गीताचे अनावरण करण्यात आले.

अमित शहा यांनी केंद्रीय सहकार मंत्री म्हणून सूत्रे स्वीकारल्यावर प्रत्येक अडचणीच्या विषयावर समन्वयाची भूमिका घेतली आहे. अम्ब्रेला ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून शहरी सहकारी बँकांसाठीही त्यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळेल.

केंद्र राज्य समन्वयातून राज्यातील सहकाराच्या अडचणींवर मार्ग निघेल असा विश्वासही मोहोळ यांनी व्यक्त केला. सोसायटी सक्षम झाल्या तरच शेतकरी गाव आणि जिल्हा सक्षम होईल. यावेळी राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, सहकार राज्यमंत्री पंकज भोयर, मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर उपस्थित होते.

‘मर्सिडीज बेंझ’कडून दोन लाख मोटारींची विक्री

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

पुणे : मर्सिडीज बेंझने १९९४ पासून भारतात २ लाख मोटारींच्या विक्रीचा टप्पा गाठला आहे. त्यातील १.५ लाख मोटारींची विक्री गेल्या दशकभरात झाली आहे. तरुण भारतीयांकडून मोटारींना जास्त पसंती मिळत आहे, अशी माहिती मर्सिडीज बेंझ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष अय्यर यांनी गुरुवारी दिली.

मर्सिडीज बेंझच्या वार्षिक पत्रकार परिषदेत संतोष अय्यर यांनी ‘ईक्यूएस एसयूव्ही ४५०’ आणि ‘जी ५८०’ या दोन नवीन इलेक्ट्रिक मोटारी सादर केल्या. ते म्हणाले की, कंपनीने देशातील ३० वर्षांच्या व्यवसायाच्या कालावधीत २०२४८ मध्ये मोटारींची उच्चांकी विक्री नोंदविली.

लोकसत्ता क्लासिफाइडस् सगळ्यांकरिता सर्वकाही

विवाहविषयक

मॅरेज ब्युरो

यंदा ‘कर्तव्य’ आहे का? सौ. कुलकर्णी विवाह संस्थेत नाव नोंदवा. ४२ वर्षांची विश्वसनीय परंपरा, लाखो लग्न जळविण्याचा अनुभव. ‘पवित्र विवाह’. 8369854313/ 8450914835/ 9892625606.

0070934850-6

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

पंजाब नैशनल बैंक punjab national bank ...the name you can BANK upon !

एसएएमडी, पीएनबी हाऊस, किंग्स्वे, स्टेशन रोड, सर्कल ऑफिस नागपूर
फोन नं. : 0712-2522156, इमेल : conagpursamd@pnb.co.in

याव्दारे नोटीस दिली जाते की खालील कर्जदार **श्री.सलिम मोहिन बैग मिर्झा (कर्जदार आणि गहाणदार) आणि श्री. किसन मंगल घुगडे (जमानतदार) शाखा कार्यालयः बल्लारपुर** यांना बँकेकडून मिळवलेल्या कर्ज सुविधेचे मुद्दल आणि व्याज परतफेड करण्यास चुक केली आहे आणि कर्ज नॉन परफॉर्मिंग ॲसेट्स (एनपीए) म्हणून वर्गीकृत केली आहेत. त्यांना त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 च्या कलम 13 (2) नुसार अंतर्गत नोटीस बजावण्यात आल्या होत्या, परंतु त्या परत केल्या गेल्या आहेत / अन सेवा केल्या गेल्या आहेत आणि म्हणून त्यांना याद्वारे या सार्वजनिक सूचना द्वारा सूचित करण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्जदार यांचे नाव	लागू करावयाच्या सुरक्षित मालमत्तेचे गुणधर्म / पत्याचे तपशिल	नोटीस दिनांक	थकबाकी रक्कम (सुचनेच्या तारखेनुसर)
1.	श्री सलिम मोहिन बैग मिर्झा (कर्जदार आणि गहानदार) आणि श्री. किसन मंगल घुबडें (जमानतदार)	रहिवासी बिल्डींगचा सर्व भाग आणि तुकडा शिट नं. 42, सिटी सर्वे नं. 948, टी. एस. नं. 17, मौजा - बल्लारपुर, एरिया 147.80 चौ. मी. चतुर्सिमा खालीलप्रमाणेः पुर्व- रस्ता, पश्चिम - जमिन सिटी सर्वे नं. 947, उत्तर - जमिनी सिटी सर्वे नं. 949, दक्षिण - रस्ता.	20.12.2024 एनपीए दिनांक 30.06.2018	३०.११.२०२४ रोजी रु. ८,८६,२३६.७२ अधिक व्याज आणि इतर शुल्क १.१२.२०२४ पासून

नोटीसच्या बदली सेवेसाठी पावले उचलली जात आहेत. वरील कर्जदार आणि जामीनदारांना याव्दारे या नोटीसच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत थकबाकीची रक्कम भरण्याने आवाहन करण्यात आले आहे. असे न झाल्यास 60 दिवसांच्या मुदतीनंतर पुढील पावले उचलली जातील. सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 च्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत नोटीसची तारीख.

कृपया सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम 13 च्या उप कलम (8) च्या तरतुदींची नोंद घ्यावी.

दिनांक : 10/01/2025 — **अधिकृत अधिकारी**
स्थळ : नागपूर — **पंजाब नॅशनल बैंक**

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

नोंद. कार्यालयः नववा मजला, अंतरिक्ष भवन, 22, के.जी.मार्ग, नवी दिल्ली-110001
फोनः 011-23357171, 23357172, 23705414, वेबसाईटः www.pnbhousing.com
नागपूर शाखाः पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि., सदनिका क्र. 301, तिसरा मजला, प्लॉट क्र. 1 व 2, गुप्ता हाऊस, रवींद्रनाथ टागोर मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर, महाराष्ट्र -440001

ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि. चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स आणि एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, 2002 मधील नियम 8(1) चे पालन करीत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13(12) अंतर्गत प्रत्येक खात्याच्या समोर नमूद करण्यात आलेल्या दिनांकास मागणी सूचना पाठवली ज्यात संबंधित कर्जदारास प्रत्येक खात्यासमोर नमूद रकमेचा सदर सूचनेच्या / सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदारांनी सदर रकमेचा भरणा न केल्याने याद्वारे कर्जदारास आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सदर नियमांमधील नियम 8 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत निम्नस्वाक्षरीकारांनी प्रत्येक खात्यासमोर नमूद करण्यात आलेल्या दिनांकास खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.

कर्जदार आणि सर्व लोकांना याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि. च्या कर्ज करारानुसार रक्कम व व्याजाच्या भाराधीन असेल.

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) मधील तरतुदींकडे कडे वेधण्यात येते.

अ. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदाराचे नाव	मागणी सूचनेचा दिनांक	थकबाकी रक्कम	ताबा घेण्याचा दिनांक	तारण मालमत्तांचे वर्णन
1	**HOU/NAG/1218/621559,** शा.का.: नागपूर	किशोर किसनूजी बहादुरे आणि श्रद्धा किशोर बहादुरे आणि अमर गोपाल शर्मा	12.09.2024	रु. 8,79,135.58/- (रुपये आठ लक्ष एकोणऐंशी हजार एकशे पस्तीस आणि अठ्ठावन्न पैसे फक्त)	06-01-2025 (सांकेतिक)	मालमत्ता क्र. प्लॉट क्र. 47, गोकुळ रेसिडेन्सी, ख.क्र. 57/2 (पश्चिम भाग), ख.क्र. 57/3, प.ह.न. 42, मौजा जामठा, नागपूर, महाराष्ट्र -44002, इंडिया.

स्थानः नागपूर दिनांकः 06-01-2025 — प्राधिकृत अधिकारी (मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.)

यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., यवतमाळ

विभागीय कार्यालय-दारव्हा मोबाईल क्र.-7058639891

जंगम मालमत्ता (भंगार स्वरुपातील) व स्थावर मालमत्तेची विक्री नोटीस नियम 8 (6) अन्वये

प्राधिकृत अधिकारी यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., यवतमाळ अंतर्गत विभागीय कार्यालय दारव्हा यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदाराचे दि. सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनन्शियल ॲसेटस ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अन्वये बँकेने ताब्यात घेतलेल्या व खालील प्रमाणे नोंद केलेली जंगम मालमत्ता (भंगार स्वरुपातील) व स्थावर मालमत्तेची निविदेद्वारे " जशी आहे तशी, जिथे आहे तिथे व ज्या स्थितीत आहे तशी विक्री'' करून, विक्री रकमेतुन कर्जाची वसुली करणे करिता" सिलबंद निविदा मागवित आहे.

कर्जदाराचा तपशिल व जंगम मालमत्ता (भंगार स्वरुपातील)/ स्थावर मालमत्तेची माहीती खालील प्रमाणे

अ. क्र.	कर्जदार व गहाणदाराचे नाव	मागणी नोटीस व ताबा दिनांक	मालमत्ता	मालमत्तेचे मुल्यांकन	कर्जदाराची बँक प्रती देय असलेली 31.12.2024 अखेर रक्कम व पुढील व्याज+ ईतर खर्च
1	शंकर जिनींग ॲंड प्रेसिंग फॅक्टरी दारव्हा प्रो.प्रा. सौ. विमल शंकरराव राठोड खाते क्र. 006144107100003	सरफेसी कायदा 2002, 13(2) मागणी नोटीस बजावणी दिनांक 20.10.2014 ताबा दिनांक-15.02.2019	1) जंगम मालमत्ता (भंगार स्वरुपातील यंत्र सामग्री व ईतर साहित्य)	3564000	रु. 4,00,06,569.00/-
			2) गहाणातील अकृषक जमिन व त्यावरील ईमारत/बांधकाम	17428457	
			एकुण	20992457	

1) निविदा विहित नमुन्यात सादर करावी लागेल. विहीत नमुना बँकेच्या वेबसाईट वरुन डाउनलोड करावा किंवा प्राधिकृत अधिकारी वि.का. दारव्हा यांचे कार्यालयातून प्राप्त होऊ शकेल 2) मालमत्ता क्र. 01 व मालमत्ता क्र. 02 ची वेगवेगळी विक्री करावयाची असल्याने स्वतंत्र निविदा सादर करावी लागेल. 3) निविदा सादर करतांना मालमत्ता क्र. 01 व मालमत्ता क्र. 02 च्या खरेदी करिता वेगवेगळी अनामत रक्कम दोन लाख रुपयाचा डी.डी. प्राधिकृत अधिकारी य.जि.मध्य. सह. बँक विभागीय कार्यालय, दारव्हा या नावाने स्वतंत्र लिफाफ्यात सादर करावा व लिफाफ्यावर खरेदी करावयाच्या मालमत्तेचा उल्लेख करावा. 4) दोनही मालमत्तेच्या निवीदा सादर करण्याची अंतीम दिनांक 18.01.2025 वेळ दु 5.00 वा. पर्यंत 5) मालमत्ता क्र. 01 यी निविदा उघडण्याची दिनांक 23.01.2025 वेळ दुपारी 12.00 वाजता 6) मालमत्ता क्र. 02 यी निविदा उघडण्याची दिनांक 23.01.2025 वेळ दुपारी 3.00 वाजता 7) विक्री करावयाची मालमत्ता व संबंधित कागदपत्राची पाहाणी करावयाची असल्यास प्राधिकृत अधिकारी, विभागीय कार्यालय, दारव्हा यांचेशी संपर्क करावा. 8) या संबधीची विस्तृत माहीती, अटी-शर्ती व मालमत्तेचे वर्णन बँकेच्या www.ydccbank.org या वेबसाईडवर उपलब्ध आहे.

दि.-06.01.2025

धनंजय बा. मुडे
प्राधिकृत अधिकारी
विभागीय कार्यालय, दारव्हा

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

अस्ति वसुली शाखा, नागपूर
शॉप नं. F-1/2/3/6/7/8, गोविंदा गौरखेडे कॉम्प्लेक्स (पहिला मजला), खसरा नं. 91/1, हजारीपहाड, सेमिनरी हिल्स, नागपूर-440006.

ताबा सुचना

ज्याअर्थी, युनियन बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने वित्तीय प्रतिभूतीकरण व पुर्नरचना आणि प्रतिभूती अंमलबजावणी अधिनियम 2002 च्या अंतर्गत तसेच प्रतिभूती हिताधिकार (अंमलबजावणी) नियमावली 2002 (नियम क्र 54 चा 2002) च्या नियम 3 सह वाचल्या जाणा-या कलम 13(12) अंतर्गत दिनांक खालील नमुद आहे ला मागणी सूचना खालील उल्लेखित खात्या समोर ही सूचना प्राप्तीनंतर 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देश्याने सुचना दिली होती.

कर्जदार / जमानतदार यांनी या रक्कमेची परतफेड न केल्यामुळे एतद् व्दारा कर्जदार / जमानतदार आणि सर्व सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की खालील सही करणा-यांनी उक्त नियमावली नियम 8 सह वाचल्या जाणा-या आणि उक्त अधिनियमाच्या कलम 13(4) च्या अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन बँकेस गहाण असलेल्या खालील मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** बँकेने घेतला आहे.

विशेष करुन कर्जदार / जमानतदार आणि सर्व सामान्य जनतेला एतद् व्दारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे देणे न करण्याकरीता ताकीद दिली जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे **युनियन बँक ऑफ इंडिया** च्या व्याजासह प्रभाराधिन राहील.

कर्जदारास आणि जमानतदाराला अधिनियमाच्या कलम 13 च्या उप-कलम (8) मधील तरतुदींमध्ये सुरक्षित कालावधीची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या बाबतीत आमंत्रित केले आहे.

अ. क्र.	कर्जदार / जमानतदार यांचे नाव	अचल संपत्तीचे वर्णन	मागणी सुचनेची तारीख	थकबाकी रक्कम (रु.)
1.	**श्री. इरफान जब्बार चिनी, श्री. जब्बार इशाक चिनी, श्री. याशिन इशाक चिनी, श्रीमती हसिना मकबुल चिनी, सुनेहरा हाजी इंतेखाब चिनी, श्रीमती. मिना हाजी अनवर चिनी, श्रीमती. लुबना इरफान चिनी आणि श्री. तैशिफ हाजी याशिन चिनी**	जमिन आणि बिल्डींगचा सर्व भाग आणि तुकडा, मेमन हाजी जब्बार इशाक चिनी (मालमत्तेचे मालक) यांच्या मालकीचे निवास, रा. प्लॉट नं. 36 पैकी येथे स्थित, आणि 37 पैकी, उप्लेटा नगर, फुलारा गार्डन जवळ, भादर चौक, सिटी ताल उप्लेटा 360490, राजकोट गुजरात आणि चतुर्सिमा खालीलप्रमाणे - पुर्व - 5255 पैकी, पश्चिम - 5249 पैकी, उत्तर - 5259 पैकी, दक्षिण - 5252 / 5256 पैकी.	01/09/2018 ताब्याची तारीख 05.01.2025	रु. 1,98,27,114.00 आणि त्यावरील व्याज

दिनांक : 05.01.2025, स्थळ : नागपूर — **अधिकृत अधिकारी, यूनियन बँक ऑफ इंडिया अस्ति वसुली शाखा**

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालयः कोहिनूर स्क्वेअर, सत्तेचाळीसावा मजला, एन.सी.केळकर मार्ग, आर.जी.गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-400028. संपर्क क्र. 9773406175.

[जोडपत्र -IV- ए] [अचल मालमत्तेसाठी नियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(6) ची तरतूद आणि नियम 6(2) ची तरतूद पाहावी]

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(1) सह वाचता येणारया नियम8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत स्थावर / जंगममत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार मे. स्टार जिनिंग फॅक्टरी, द्वारे त्यांचे प्रोप्रायटर श्री मिर्झा नदीम बेग, मिर्झा नबी बेग, मो. राझिक मो. इशाक आणि मिर्झा वसीम बेग मिर्झा नबी बेगयांना आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे नजरगहाण असलेल्या जंगम वस्तूंसह तारण/भारग्रस्त असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेचासुरक्षित धनको ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारयांनी दि. 06.08.2024 रोजी प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून त्यांची सुरक्षित धनको मे. ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडयांना वर नमूद कर्जदार व सह-कर्जदार यांचेकडून दि. 26.09.2022 नुसार **रु. 1,54,72,683/- (रुपये एक कोटी चौपन्न लक्ष बहात्तर हजार सहाशे त्र्याऐंशी फक्त)** अधिक व्याज व इतर खर्च एवढ्या रकमेच्या वसुलीसाठी दि. 28.01.2025 रोजी स. 11.00 वाजतारोजी स. 11.00 वाजता (बोली सदर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ आहे **29.01.2025** रोजी सायं. 6.00 वा.) ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'', ''तेथे जे काही आहे'' आणि ''उपाय नाही'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

(ओमकारा पीएस 36/2021-22चे ट्रस्टी म्हणून काम पाहणारया) ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांनी दि. 28.09.2021रोजीच्या अभिहस्तांकन करारान्वये सदर कर्जदार / जामीनदार यांची संपूर्ण थकबाकी कर्जे त्यांमधील अंतर्निहित अनामर्तीसह दि अकोला अर्बन को-ऑप बँक लि. यांचेकडून अधिग्रहित केली आहेत.

अचल मालमत्तांचे वर्णन, आरक्षित किंमत, बयाणा रक्कम, आणि (असल्यास) ज्ञात बोजे इ. चे वर्णन पुढीलप्रमाणे आहेः

मालमत्तेचे वर्णन	आरक्षित किंमत	बयाणा रक्कम
स्टार जिनिंग फॅक्टरी बिल्डींग, मौजे बार्शीटाकळी, सर्वे क्र. 12/3, एकूण प्लॉट क्षेत्रफळ 34431.23 चौ.फू. आणि फॅक्टरी बिल्डींग बांधकाम सुमारे 6539.42 चौ.फू. सोबत प्लांट व मशिनरी (औद्योगिक युनिट) जिल्हा अकोला.	रु. 1,00,00,000/-	रु. 10,00,000/-

ई-लिलाव दिनांक	29.01.2025रोजी स. 11.00 ते दु. 1.00 वाजेपर्यंत
किमान बोली वृद्धी रक्कम	रु. 50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त)
सहभागासाठी बोली पत्र/केवायसी दस्तावेज / बयाणा रकमेचा पुरावा सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळः	28.01.2025रोजी सायं. 6.00 वा.
पाहणीचा दिनांक	24.01.2025रोजी दु. 01.00 ते 04.00 वाजेपर्यंत
ज्ञात बोजे	ज्ञात नाहीत

हे प्रकाशन सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002मधील नियम 9(1) सह वाचता येणारया नियम8(6) च्या अंतर्गत कर्जदार / सह-कर्जदारांसाठी असलेली पंधरा दिवसांची सूचनादेखील आहे.

विक्रीच्या अटी व शर्तीच्या तपशीलासाठी कृपया http://omkaraarc.com/auction.php येथे दिलेली लिंक पाहावी आणि प्राधिकृत अधिकारी प्रतीक्षा पटेल यांचे संपर्क तपशील (संपर्क क्र. 9773406175 आणि राजेंद्र देवर्डे -9324546651 आणि ईमेल-Pratiksha.patel@omkaraarc.com. बोलीदार वेबसाईटला http:// www.bankeauction.com येथेसुद्धा भेट देऊ शकतात किंवा सेवा पुरवठादार मे. सी1 इंडिया प्रा.लि., टेली. हेल्पलाईनः +91-7291981124 / 25/ 26, हेल्पलाईन ई-मेल आयडीः support@banke auctions.com, श्री भाविक पंड्या, मोबाईलः 88666 82937 ईमेलः Maharashtra@c1india.com येथे संपर्क साधू शकतात. इच्छुक बोलीदारांनी नादारी व दिवाळखोरी संहिता, 2016 मधील अनुच्छेद 29ए चे पालन करावे आणि त्या अंतर्गत शपथपत्र सादर करावे.

स्वा/-, प्राधिकृत अधिकारी
दिनांकः 10.01.2025 — ओमकारा असेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
स्थानः अकोला — (ओमकारा पीएस 36/2021-22 ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम पाहणारे)

यूको बैंक (भारत सरकार का उपक्रम) सम्मान आपके विश्वास का UCO BANK (A Govt. of India Undertaking) Honours Your Trust

क्षेत्रिय कार्यालय : जयका मोटर्स बिल्डींग तिसरा माळा,कमर्शियल रोड सिव्हील लाईन्स, नागपूर-440001

ताबा सुचना (रुल 8 (11) अचल संपत्ती करीता)

ज्याअर्थी सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट-2002 च्या (2002 च्या क्रमांक 54) अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्ता हे युको बँकेचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरीटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स 2002 च्या सेक्शन 13(12)च्या सोबत वाचल्या जाणा-या रूल 9 च्या अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारानुसार त्यांली खाली नमुद केलेल्या कर्जदारांना त्यांच्या नावा समोर नमुद केलेल्या तारखेला डिमांड नोटीस जारी केली. खाली टेबलमध्ये नमुद केल्याप्रमाणे नोटीस मध्ये दर्शविलेली रक्कम तसेच त्यावरील व्याज व इतर देय ही नोटीस प्राप्तीनंतर 60 दिवसांच्या आत परतफेड करण्याच्या उद्देशाने ही नोटीस जारी करण्यात आली होती.

कर्जदार/जमानतदार हे रकमेची परतफेड करण्यास अपयशी ठरल्याने कर्जदार/जमानतदार व सर्व सामान्य जनतेला या सुचनेद्वारे सुचना देण्यात येते की खालील सही करणा-याने उपरोक्त नियमांच्या रूल 8 सह वाचल्या जाणा-या उपरोक्त कायदयाच्या कलम 13(4) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील वर्णन केलेल्या संपत्तीचा कब्जा घेतलेला आहे.

विशेषतः कर्जदार व जमानतदार आणि सर्व सामान्य जनतेला या सुचनेद्वारे खालील लिहिलेल्या संपत्तीबाबत कोणता ही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि या संपत्ती संदर्भात कोणते ही व्यवहार हे युको बँकेच्या खाली निर्देशित राशी तसेच त्यावरील व्याज + इतर प्रभार यांच्या प्रभाराधीन राहील.

सुरक्षित मालमत्तेची परतफेड करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, अधिनियमाच्या कलम 13 मधील उपकलम (8) च्या तरतुदीसाठी कर्जदाराचे लक्ष आमंत्रित केले जाते.

कर्जदार/जमानतदाराचे नाव	थकीत रक्कम	मागणी सुचनेची तारीख	अचल संपत्तीचे वर्णन
शाखा : रामटेक कर्जदार : मे.संकल्प सेल्स प्रो.श्री सचिन सुखदेव मेश्राम	रु. 28,04,194.39 + व्याज आणि शुल्क	मागणी सुचनेची तारीख 13.12.2023 प्रत्यक्ष ताबा दिनांक 07.01.2025	जागेचा सर्व भाग आणि तुकडा घर प्रापर्टी ग्रामपंचायत घर नं.687 लेआऊट प्लॉट नं.7, एनएस नं.89, अंदाजे आराजी 275 स्के.मि. ग्रामपंचायत घर नं.687 आणि टिन शेड चा बांधकाम एरिया 930.00 स्के.फीट ग्रामपंचायत टॅक्स ॲसेसमेंट, राईट ओनरशिप मौजा शितलवाडी, तह.रामटेक, ग्रामपंचायत शितलवाडी (परसोडा) च्या क्षेत्रामध्ये मौजा नं.360, पीसी नं.38, तह.रामटेक, जि.नागपूर. चर्तु:सिमा : पुर्वेस-लेआऊट प्लॉट नं.6, पश्चिमेस- लेआऊट प्लॉट नं.8, उत्तरेस-लेआऊट प्लॉट नं.49 आणि 50, दक्षिणेस-रोड
शाखा : इतवारी कर्जदार : श्री मिलींद सुधाकर साठे श्रीमती प्रियंका मिलींद साठे	रु. 35,50,783.81 + व्याज आणि शुल्क	मागणी सुचनेची तारीख 30.04.2024 सांकेतिक ताबा दिनांक 08.01.2025	सर्व आरसीसी सुपरस्ट्रक्चर फ्लॅट/अपार्टमेंट नं.2 बिल्ट अप एरिया 44.89 स्के.मि. आणि सुपर बिल्ट अप एरिया 69.75 स्के.मि. (750 स्के.फीट) दुसरा माळा बिल्डींग चे नाव "श्री साई अपार्टमेंट" बांधकाम केलेला जागेचा सर्व भाग आणि तुकडा प्लॉट नं.42, अंदाजे आराजी 135 स्के.मि. (1453.14 स्के.फीट) जागेचा उर्वरित भाग खसरा नं.26/1, 26/4 आणि 26/5, सिटी सर्व्हे नं.583, शिट नं.47, 26/1 मौजा बोरगांव, प.ह.नं.8, तह. आणि जि.नागपूर एकत्रित 33.33 प्रतिशत अविभक्त हिस्सा आणि व्याज प्लॉट नं.42 चर्तु:सिमा : पुर्वेस-प्लॉट नं.41, पश्चिमेस-प्लॉट नं.43,उत्तरेस-प्लॉट नं.23,दक्षिणेस-9 मि.वाईड रोड सर्व आरसीसी सुपरस्ट्रक्चर फ्लॅट/अपार्टमेंट नं.1 बिल्ट अप एरिया 44.89 स्के.मि. आणि सुपर बिल्ट अप एरिया 69.75 स्के.मि. (750 स्के.फीट) दुसरा माळा बिल्डींग चे नाव "श्री साई अपार्टमेंट" बांधकाम केलेला जागेचा सर्व भाग आणि तुकडा प्लॉट नं.42, अंदाजे आराजी 135 स्के.मि. (1453.14 स्के.फीट) जागेचा उर्वरित भाग खसरा नं.26/1, 26/4 आणि 26/5, सिटी सर्व्हे नं.583, शिट नं.47, 26/1 मौजा बोरगांव, प.ह.नं.8, तह. आणि जि.नागपूर एकत्रित 33.33 प्रतिशत अविभक्त हिस्सा आणि व्याज प्लॉट नं.42 चर्तु:सिमा : पुर्वेस-प्लॉट नं.41, पश्चिमेस-प्लॉट नं.43,उत्तरेस-प्लॉट नं.23,दक्षिणेस-9 मि.वाईड रोड

नागपूर दि.09.01.2025 — प्राधिकृत अधिकारी युको बँक